**प्रेस नोट**

**स्थागुशा, यवतमाळ**
**दिनांक २७/०६/२०१८**

## पाटीपुरा परीसरातील खुनाच्या गुन्हयाचा उलगडा अवघ्या २४ तासाचे आत करुन आरोपीं अटक

दि.२६/०६/२०१८ रोजी फिर्यादी नामे श्यामराव पुंडलीक इंगळे वय ४९ वर्ष धंदा रोजमजुरी रा.अंबिका नगर रोड,अशोक नगर,यवतमाळ यांनी रिपोर्ट दिला की, फिर्यादीचा मृतक पुतण्या नामे रविंद्र श्यामराव इंगळे वय २५ वर्ष यास कोणीतरी अज्ञात ईसमाने कोण्यातरी हत्याराने पोटावर भोसकुन जीवे ठार मारले अशा फि च्या रिपोर्ट वरुन यवतमाळ शहर येथे अज्ञात आरोपी विरुध्द अप क्र.५२१/१८ कलम ३०२ भादविचा गुन्हा नोंद करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे टोळी विरोधी पथक हे सदर गुन्हयातील अज्ञात आरोपींचा कशोसीने शोध घेत असतांना त्यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की,मृतक रविंद्र श्यामराव इंगळे याचा खुन मुन्ना ठाकुर व अक्षय वानखडे यांनी केला असुन ते पाटीपुरा परीसरात लपुन आहेत अशी गोपनीय माहीती मीळाले वरुन खुनातील आरोपी नामे १) मुन्ना ऊर्फ जयप्रकाश गोरखसिंग ठाकुर वय २८ वर्ष रा.पाटीपुरा,यवतमाळ २)अक्षय संजय वानखडे वय २० वर्ष रा.अन्नाभाउ साठे चौक,पाटीपुरा,यवतमाळ यांना टोळी विरोधी पथकाने पाटीपुरा परीसरातुन सापळा रचुण मोठया शिताफीने ताब्यात घेवुन घडलेल्या गुन्हया बाबत विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी रविंद्र इंगळे याचा जुन्या वादातुन खुन केल्याचे कबुल केल्याने त्यांना गुन्हयाचे पुढील तपासकामी पोस्टे.यवतमाळ शहर यांचे ताब्यात देण्यात आले.अज्ञात आरोपी असलेला अत्यंत गुंतागुंतीचा असलेला खुनाच्या गुन्हयाचा उलगडा अवघ्या २४ तासाचे आत करुन दोन अज्ञात आरोपी निष्पन्न करुन आरोपींना जेरबंद करण्यात आले.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्री एम. राज कुमार, मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री.अमरसींह जाधव,मा.उपविपोअ श्री.पियुष जगताप,पोलीस निरीक्षक श्री मुकुंद कुलकर्णी स्थागुशा, यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली टोळी विरोधी पथकाचे पोउपनि संतोष मनवर, सफौ/ऋषी ठाकुर, पोहेकॉ/संजय दुबे,गणेश देवतळे,योगेश गटलेवार पोना/अमोल चौधरी,किरण श्रीरामे,आशिष गुल्हाणे,विनोद राठोड,जयंत शेंडे,श्रीधर शिंदे,राज कांबळे,यशवंत जाधव,शशीकांत चांदेकर,आकाश सहारे,गौरव ठाकरे,निलेश पाटील,सतिश सिडाम,राम सोळंकी यांनी केली.

Mukund K. Kulkarni
P.I. L.C.B., Yavatmal